(MGT)

( महात्मा गांधी तंटामुक्त गाव )

4MGT060801

**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : १७ जून, २००८.

<u>वाचा :-</u> १) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमआयएस-२००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९.७.२००७.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक १७ जून, २००८.

<u>शासन निर्णय :-</u>

शासन निर्णय, क्रमांक तंमुगा-१००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक ११ एप्रिल, २००८ अन्वये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेच्या संदर्भात प्रसिध्दीसाठी वृत्तपत्रांच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबतच्या तरतुदी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट - अ मधील अट क्र.१२ येथे "अर्जदारांनी परिशिष्ट-ब येथे विहित नमुन्यात आपला अर्ज ३ प्रतीत संबंधित जिल्हा स्तर, विभागीय स्तर व राज्य स्तर समित्यांकडे दरवर्षी दिनांक १५ जून पूर्वी पोहोचेल असा पाठवावा. दिनांक १५ जून नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही" अशी तरतूद आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम अंमलबजावणीचे हे प्रथम वर्ष असून उक्त पुरस्कारांसाठी सर्व संबंधित वृत्तपत्रांच्या बातमीदारांना अर्ज करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा याकरिता केवळ या वर्षाच्या पुरस्कार कार्यक्रमाच्या वेळापत्रकात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत पुढीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे:-

१) शासन निर्णय परिशिष्ट-अ येथील अट क्रमांक-१२ मध्ये विहित केलेला अर्ज प्राप्तीचा **"दिनांक १५ जून"** याऐवजी केवळ या वर्षाकरिता **"दिनांक ३० जून, २००८"** असा राहील.

२) शासन निर्णय परिशिष्ट-अ येथील अट क्रमांक-१३ च्या संदर्भात जिल्हा स्तरावरील समिती प्राप्त अर्जासोबतच्या साहित्याचे परिक्षण करुन प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ येणा-या उमेदवारांची नावे **"दिनांक ५ जुलै"** ऐवजी **"दिनांक १५ जुलै, २००८"** पर्यन्त प्रथम पुरस्कार प्राप्त उमेदवाराच्या साहित्यासह संबंधित विभागीय स्तर समितीकडे गोपनीयरित्या पाठविल. तसेच आपला निकाल विभागीय समितीमार्फत गोपनीयरित्या शासनास सादर करील.

३) शासन निर्णय परिशिष्ट-अ येथील अट क्रमांक-१४ च्या संदर्भात विभागीय स्तर समिती अर्जासोबतच्या साहित्याचे परिक्षण करुन प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ येणा-या उमेदवारांची नावे **"दिनांक २० जुलै"** ऐवजी **"दिनांक २५ जुलै, २००८"** पर्यन्त प्रथम पुरस्कार प्राप्त उमेदवाराच्या साहित्यासह नामनिर्देशनासाठी राज्य स्तर समितीकडे पाठविल.

२. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक **२००८०६१८१५५४०९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा.आ.गुट्टे

( मा.आ.गुट्टे )

अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व प्रशासकीय विभागांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व पोलीस अधीक्षक.
सर्व उप विभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचे मार्फत)
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचे मार्फत)
सर्व गटविकास अधिकारी
सर्व तहसीलदार
सर्व पोलीस ठाणे प्रभारी
निवड नस्ती, पोल १५

--------